महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग,
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
आनंद ऋषीजी महाराजमार्ग (दिंडोरीमार्ग), नाशिक-४२२ ००४

☎ :- (०२५३) अधीक्षक अभियंता - २५३०६२१ व्यावसायिक परीक्षा शाखा- २५३२८७९ फॅक्स - २५३०२५१, २५३०६५१,
ई-मेल – metanashik@gmail.com. वेबसाईट – www.metanasik.org


# परिपत्रक

**विषय :** महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग १ - राजपत्रित संवर्गातील अधिका-यांची ऑनलाईन व्यावसायिक परीक्षा-
सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व सहाय्यक अभियंता श्रेणी १/उपविभागीय अभियंता/उपविभागीय अधिकारी /उप अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) यांची माहे फेब्रुवारी 2020 मध्ये घेण्यात येणारी व्यावसायीक परीक्षा. ...

**संदर्भ:** महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका,१९८४ सहावी आवृत्ती,
परिशिष्ठ एक (परिच्छेद ५४ )

महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग क्रमांक इएक्स्एम्/१०१२ (४४५), दिनांक ६/९/१९८२ अन्वये दिलेल्या आदेशानुसार जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांच्या विषयांकित व्यावसायिक परीक्षा दिनांक १०/०२/२०२० ते १२/०२/२०२० या कालावधीत महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक या कार्यालयामार्फत घेण्याचे नियोजित केले आहे. सदर परीक्षा महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार घेण्यात येतील.

सदर परिपत्रक, प्रवेश अर्जासंबंधीच्या सूचना, प्रवेश अर्ज नमुना इ. माहिती प्रबोधिनीच्या संकेतस्थळावर (www.metanasik.org) उपलब्ध आहे. मागील वर्षाचा प्रवेश अर्जाचा नमुना ग्राहय धरला जाणार नाही. प्रबोधिनीतर्फे कोरे अर्ज पुरविण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

१. तसेच सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य)/ सहाय्यक अभियंता श्रेणी-१ /उप विभागीय अभियंता /उप विभागीय अधिकारी /उप अभियंता (स्थापत्य /यांत्रिकी / विद्युत) यांची व्यावसायिक परीक्षा **नाशिक केंद्रावर** घेण्याचे नियोजित आहे.

२. इच्छुक उमेदवारांसाठी प्रवेशासाठी अर्जाचा नमुना नियंत्रक अधिका-यांकडून मागवून घ्यावा किंवा प्रबोधिनीच्या (मेटा) संकेत स्थळावरुन (www.metanasik.org) प्राप्त करुन घ्यावा.

3. सन 2020 च्या परीक्षेसाठी प्रवेश अर्ज पूर्ण पणे भरुन नियंत्रक अधिका-यांमार्फत आवश्यक शिफारशीसह दि. 15/01/2020 पर्यत कार्यालयात पोहोचेल अशारितीने पाठवावे. दि. 15/01/2020 नंतर आलेल्या तसेच अपुरी माहिती / अपुरी प्रमाणपत्रे असलेल्या व संबंधीत नियंत्रक अधिकारी यांचेमार्फत न आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. व त्याबाबत पत्रव्यवहारही केला जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

३. **सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेमधील परीक्षा नियमावलीनुसार व वेळोवेळी शासनाकडून निर्गमित झालेल्या मार्गदर्शक सुचनानुसार व्यावसायिक परीक्षेस बसण्यास अर्जदार पात्र असल्याबद्दलची नियंत्रक अधिकारी यांनी स्वतः खात्री करावयाची असून त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी नियंत्रक अधिकारी यांची राहील.**

५. नियंत्रक अधिका-यांकडून अर्ज पाठविण्यास उशिर झाला व परीक्षार्थीस प्रवेश नाकारण्यात आला तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नियंत्रक अधिका-यांची राहील.

६. सर्व नियंत्रक अधिका-यांना विनंती करण्यांत येते की, या परिपत्रक मिळाल्यापासून २ (दोन) आठवड्याच्या आत इच्छुक परीक्षार्थींच्या निदर्शनास आणावा. विहीत नमुना अर्ज व सुचनापत्र यांच्या झेरॉक्स प्रती काढून त्या इच्छुक परिक्षार्थीना उपलब्ध करुन दयाव्यात. परीक्षार्थीने सादर केलेले अर्ज सर्व त-हेने पूर्ण भरुन सर्व बाबींची सत्यता पडताळणी व विशेष करुन सूचना पत्रकातील सूचना क्र. (१२) व (१३) च्या अनुषंगाने तपासणी करुन, आवश्यक तेथे प्रमाणपत्र देऊन सदर अर्ज प्रबोधिनीकडे दिनांक **१५/०१/२०२०** पर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचेल अशा पध्दतीने पाठवावेत अथवा खास दुतामार्फत सादर करावेत.

स्थळ प्रत मा.अ.अ.व सहसंचालक यांना मान्य असे

उपसंचालक (व्या.प.),
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

**सहपत्र :** १) प्रवेश अर्जाचा नमुना
२) प्रवेश अर्ज भरण्याबाबत सुचना

**जा.क्र.मअप्रप्र/व्याप/रापअ/परीक्षा/ ५६ /२०१९.**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४.
**दिनांक: ०१/११/२०१९**

**प्रत-**
१. मा. सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास) / मा. सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना माहितीसाठी सादर.
२. मा. सचिव, (सां.बा.) / मा.सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना महितीसाठी सादर.
३. मा.महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना माहितीसाठी सादर.
४.मा.कार्यकारी संचालक, ------------------------------------------------------------
यांना माहितीसाठी सादर.

**प्रत - माहिती व योग्य कार्यवाहीस्तव अग्रेषित.**
१. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग / सा.बां.विभाग, ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
२. आयुक्त (महसूल विभाग / महानगरपालिका) ------------------------------------------------------------
३. अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग / सा.बां.विभाग, ------------------------------------------------------------
४. जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी / संचालक ------------------------------------------------------------

# महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, दिंडोरी रोड, नाशिक

### महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-१ — राजपत्रित संवर्गासाठी व्यावसायीक परीक्षा सन २०२०

### प्रवेश अर्ज

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक | | **परीक्षार्थीने भरावयाची माहिती**<br>अभियांत्रिकी कक्षाचे नांव:- स्थापत्य/ **यांत्रिकी/ विद्युत** |
| **कार्यालययाच्या उपयोगासाठी** | | **व्यावसायीक परीक्षेचा प्रवर्ग:-** सहा. कार्यकारी अभियंता/ स.अ.श्रे-१/उ.वि.अभियंता/अधिकारी /उप अभियंता |
| | | **परीक्षा केंद्र :**<br><br>**परीक्षा शुल्क देय आहे काय? :- आहे/नाही**<br>**चलनाचा तपशील :-**<br>(बँकेचे नांव व शाखा) |
| | | **चलन क्रमांक व दिनांक :**<br>(अर्जासोबत **चलनाची मुळ प्रत** अनिवार्य) |
| | | **टिप:** परीक्षार्थीने भरावयाच्या माहितीमधील अनावश्यक पर्याय खोडावेत) |

---

**परीक्षार्थीचे विनंतीपत्र**

प्रति,
मा. अधीक्षक अभियंता व सहसंचालक,
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

| पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व संबंधित का.अ./अ.अ. यांनी प्रमाणित करावा |
|---|
| |

**(नियंत्रक अधिकारी यांचे मार्फत सविनय सादर)**

**विषय :-** फेब्रुवारी 2020 मध्ये घेतली जाणारी सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व सहाय्यक अभियंता श्रेणी १ / उपविभागीय अभियंता / उपविभागीय अधिकारी / उप अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) यांची व्यावसायिक परीक्षा....

मा.महोदय,

मी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------
विषयांकित संवर्गातील ---------------------------------- या प्रवर्गाच्या व्यावसायिक परीक्षेस प्रवेश मिळणेसाठी विहित नमुन्यातील अर्ज माझे नियंत्रक अधिकारी अधीक्षक अभियंता / अ.अ.व प्रशासक/ मुख्य कार्यकारी अधिकारी ---------------------------------- मार्फत सविनय सादर करीत आहे.

मी व्यावसायिक परीक्षेच्या अभ्यासक्रमाची आणि परीक्षा नियमावलींची माहिती करून घेतली आहे.

प्रवेश अर्जामधील माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे असे आढळून आल्यास मी परीक्षार्थी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------------------------ शिस्तभंगाच्या कारवाईस / विभागीय चौकशीस आणि उत्तीर्ण झाल्यामुळे घेतलेले सेवालाभ गमविणे या दोन्ही बाबीस पात्र ठरेन याची मला पूर्ण जाणीव आहे, याचीही मी नोंद घेतली आहे.

माझा वैयक्तिक तपशील खालीलप्रमाणे -

**परीक्षार्थीची वैयक्तिक माहिती.**

**१. परीक्षार्थीचे नांवः-** **आडनांव** **पहिले नांव** **मधले नांव**

**मराठी -**

**इंग्रजी -**

**२. जन्मदिनांकः-** परिक्षार्थिचा मोबाईल नंबर -

**३. शैक्षणिक पात्रताः-**

**४. पदनामः-**

**५. पदावर रुजू झाल्याचा दिनांकः-**

**६. नेमणूकीचा / पदोन्नतीचा आदेश क्रमांक व दिनांकः-**

**७. कार्यरत कार्यालयाचा तपशिल (दूरध्वनी क्रमांकासह):-**

**अ) उपविभागः**

**ब) विभागः**

**क) मंडळ (मराठी व इंग्रजी) :**

**ड) मंडळ कार्यालयाचा ई मेल :**

**८. परीक्षार्थीस ज्या विषयांच्या परीक्षेस बसावयाचे आहे त्या विषयांची नांवेः**

| अ.क्र. | परीक्षेचा विषय | परीक्षार्थीने निवडलेले विषय |
|---|---|---|
| १ | अनिवार्य विषय : सामान्य अभियांत्रिकी (स्था./यां./वि.) (प्रश्नपत्रिका - १) | सामान्य अभियांत्रिकी (स्था./यां./वि.) |
| २ | ऐच्छिक विषय : ( प्रश्नपत्रिका - २) | |
| ३ | अनिवार्य विषय : लेखानियम (प्रश्नपत्रिका - ३) | लेखानियम |
| ४ | अनिवार्य विषय :- प्रात्यक्षिक : (सर्वेक्षण-स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) (प्रश्नपत्रिका - ४) | |
| **टिप:-** सहाय्यक कार्यकारी अभियंता प्रवर्गासाठी प्रात्यक्षिक परीक्षा नाही. | | |

**९. यापुर्वीच्या व्यावसायिक परीक्षेमध्ये महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम नियम पुस्तिका १९८४, सहावी आवृत्ती (परिच्छेद ५४) परिशिष्ट १, भाग 1 ब मधील नियम क्र. १२ नुसार सूट मिळालेल्या विषयाचा तपशील:**

| अ.क्र. | विषय | प्राप्त गुण | एकूण गुण | परीक्षेचे वर्ष | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(**<u>टिप:-</u>** वर नमूद केलेल्या सूट प्राप्त विषयांची नियंत्रक अधिका-याने मुळ निकाल पत्रावरुन खात्री करावी.)

आपला / आपली विश्वासू,

दिनांक :

(परीक्षार्थीची सही)

ठिकाण :

## नियंत्रक अधिका-यांचे प्रमाणपत्र

**प्रमाणित करण्यांत येते की -**

१. परीक्षार्थी श्री/श्रीमती / कुमारी ---------------------------------------- यांची प्रथम नेमणूक ------------ ---------------------------------------- या पदावर झाली असून त्यांचे सध्याचे पद ---------------------------------------- ---------------------------------------- आहे व ते या पदावर दिनांक ................ पासून कार्यरत आहेत.

**त्यांची पदोन्नती अभावित / तात्पुरती नसल्याने ते परीक्षेस बसण्यास पात्र आहेत.**

२. परीक्षार्थीने अर्जात भरलेल्या बाबींची पडताळणी सेवा पुस्तकावरुन / मूळ दप्तरावरुन केली असून ती बरोबर आहे.

३. सन ________ या वर्षाच्या परीक्षेच्या निकालाच्या आधारावर परीक्षार्थीस सूट देय ठरत असलेले विषय मी त्याच्या मुळ निकाल पत्रावरुन तपासले असून ते बरोबर आहेत.

४. श्री./श्रीमती/कुमारी ---------------------------------------- पदनाम -------------------------- यांचे वय त्यांच्या राजपत्रित संवर्गाचे **पदोन्नतीचे** दिनांकास ४० वर्षे पूर्ण आणि ४५ वर्षापेक्षा कमी असून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेमधील परीक्षा नियमावली [नियम (बी)-२] नुसार त्याची खातरजमा केलेली आहे. त्यांना लेखानियम या विषयाखेरीज इतर सर्व विषयांत सूट देय आहे. सदरची सूट त्यांना कार्यालयीन आदेश क्रमांक- व पत्र जा.क्रं. ---------------------------------------- दिनांक ______________ अन्वये देण्यात आलेली आहे.

५. महाराष्ट्र सार्वजनीक बांधकाम पुस्तिकेमधील नियमानुसार श्री. ---------------------------------------- परीक्षेस बसण्यास पात्र असल्याने त्यांना परीक्षेस प्रवेश देण्यास शिफारस करण्यांत येंत आहे.

दिनांक:

ठिकाण:

**नियंत्रक अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का**

---

**कार्यालयीन उपयोगासाठी** **पात्र**

| |
|---|
| |

**प्रबोधिनीने दिलेला आसन क्रमांक**

**उप संचालक (व्यावसायिक परीक्षा)**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक.

# परीक्षा प्रवेश पत्र

परीक्षार्थीचे नांव -

| पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व संबंधित का. अ./ अ.अ. यांनी प्रमाणित करावा |
|---|

पदनाम -

**विषय:-** महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग १ - राजपत्रित संवर्गातील माहे फेब्रुवारी 2020 मधील व्यावसायिक परीक्षेचे प्रवेश पत्र- सहाय्यक कार्यकारी अभियंता (स्था.) व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ / उपविभागीय अभियंता / उपविभागीय अधिकारी / उपअभियंता (स्था./यां./वि.) प्रवर्ग.

**दिनांक** दि १०/०२/२०२० ते १२/०२/२०२० या कालावधीत होणा-या विषयांकित व्यावसायिक परीक्षेला बसण्यासाठी आपणांस परवानगी देण्यात येत आहे.

**परीक्षार्थीचे जन्म दिनांक -** **मोबाईल नंबर -**

**परीक्षार्थी आसन क्रमांक** [ ] (परीक्षार्थीने उत्तरपत्रिकेवर सदर आसन क्रमांक लिहावयाचा आहे)

**१) परीक्षा केंद्र / ठिकाण:**

**2) आपण निवडलेला ऐच्छिक विषय -**

**३) समन्वय अधिकारी यांचे नांव व पत्ता:**

**परीक्षार्थीची स्वाक्षरी**

**उप संचालक (व्यावसायिक परीक्षा),**
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक.

**टिप-** परीक्षार्थीने सदर प्रवेश पत्रावर स्वता:चे नांव, पदनाम व जन्म दिनांक व मोबाईल क्रमांक लिहीणे अनिवार्य आहे

## परीक्षार्थीसाठी विशेष सूचना :

१) परीक्षार्थीने परीक्षेच्या वेळेपूर्वी कमीतकमी ६० (साठ) मिनिटे अगोदर परीक्षा कक्षांत उपस्थित असणे आवश्यक आहे. परीक्षा सुरु झाल्यानंतर अर्ध्या तासानंतर येणा-या उमेदवारांस परीक्षेस उपस्थित राहण्यांस परवानगी देण्यांत येणार नाही.

२) परीक्षार्थीने परीक्षेसाठी लागणारे सर्व साहित्य उदा. पेन,पेन्सिल,खोडरबर,गणिती उपकरणे, इ.स्वतःआणावयाचे आहे.

३) परीक्षेस येतांना हे प्रवेशपत्र सोबत आणावे व समन्वय अधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी ज्या ज्या वेळी मागतील त्या त्या वेळी दाखवावे.

४) परीक्षार्थींनी कुठलाही थेट पत्रव्यवहार महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीशी करु नये असा पत्रव्यवहार करणा-याची गंभीर दखल घेण्यांत येईल.

५) प्रवेशपत्र परीक्षेचा निकाल लागून त्याची सेवापुस्तकात नोंद होईपर्यंत जपून ठेवावे. याची दुसरी किंवा नक्कल प्रत मिळणार नाही.

परीक्षेचे वेळापत्रक आपल्या माहितीकरीता खालीलप्रमाणे दिले आहे. परीक्षेसंबंधात आपणास काही अडचण आल्यांस आपले केंद्राचे समन्वय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

### परीक्षेचे वेळापत्रकः

| वार | दिनांक | वेळ (कालावधी) | विषय | शेरा |
|---|---|---|---|---|
| सोमवार | १०/०२/२०२० | सकाळ सत्र | सामान्य अभियांत्रिकी (स्था./यां./वि.) | **ऐच्छिक विषय :-** (परीक्षार्थीने ऐच्छिक विषयाचे नांव लिहावे.) |
| | | दुपार सत्र | ऐच्छिक विषय (स्था. / यां. /वि.) | |
| मंगळवार | ११/०२/२०२० | सकाळ सत्र | लेखानियम (स्था./ यां./ वि.) | |
| बुधवार | १२/०२/२०२० | समन्वय अधिकारी वेळ जाहिर करतील. | प्रात्यक्षिक परीक्षा (स्था./ यां./ वि.) | |

**टीपः-** सहाय्यक कार्यकारी अभियंता पदाकरीता प्रात्यक्षिक परीक्षा नाही.

**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक**

**विषय :** सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी १/उपविभागीय अभियंता/ उपविभागीय अधिकारी, उप अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत) यांची माहे फेब्रुवारी 2020 मध्ये घेण्यांत येणारी व्यावसायिक परीक्षा.

**-सूचनापत्र -**

**व्यावसायिक परीक्षेस प्रवेश अर्ज भरण्यासंबंधी सविस्तर सूचना**

## सदर सूचनापत्र अर्जासोबत पाठवू नये.

१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

२) प्रवेश अर्जासाठी विहित नमुन्याची टंकलिखीत अगर छायांकित प्रत वापरावी.

३) प्रवेश अर्जावर आणि परीक्षा प्रवेशपत्रावर परीक्षार्थीने स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो दर्शविलेल्या जागी चौकोनामध्ये चिकटविणे आवश्यक आहे. सदर फोटोवर संबंधीत का.अ./अ.अ. यांचा साक्षांकनासाठी सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

४) परीक्षार्थीने संपूर्ण नांव ठळक अक्षरांत मराठी आणि इंग्रजीत (प्रथम लिपीत) लिहावयाचे आहे.

५) परीक्षार्थीने (मूळ सेवापुस्तकातील नोंदीप्रमाणे) त्याची जन्मतारीख लिहावी.

६) परीक्षार्थीने ज्या शासकीय आदेशानुसार पदोन्नती / नियुक्ती देण्यांत आली त्या आदेशाचा दिनांक व क्रमांक नमूद करावयाचा आहे.

७) परीक्षार्थी शासनाच्या जलसंपदा / सार्वजनिक बांधकाम विभागाव्यतिरीक्त इतर अशासकीय / निमशासकीय अथवा महामंडळे उदा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), महापालिका इ.) यांचे अधिकारी असतील तर परीक्षा शुल्क रु. ३०००/-(तीन हजार मात्र) भरावे लागेल. **परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया, मेरी शाखा, नाशिक या बचत खाते क्रं. १०९३४४१९८४५ वर Assistant Director (Adm.) Maharashtra Engineering Training Academy, Nashik या खात्यावर जमा करावेत व त्याची Original Counter Slip प्रवेश अर्जासोबत जोडण्यात यावी. व Counter slip च्या खाली / पाठीमागे परीक्षार्थीनी स्वत:चे पूर्ण नांव व पत्ता लिहावा. सदरचे परिक्षा शुल्क कोठल्याही स्थितीत परत केले जाणार नाही. अगर त्यांचा पुढील वेळेस परीक्षेस बसण्यास उपयोग होऊ शकणार नाही.**

८) विहीत नमुन्यातील ऑनलाईन प्रवेश अर्ज संपूर्ण भरुन तो परीक्षार्थीने नियंत्रक अधिका-यांकडे सादर करावा. नियंत्रक अधिका-यांमार्फत न आलेले अर्ज स्विकृत करण्यात येणार नाहीत.

**९) अर्ज स्वीकृतीचा अंतिम दिनांक १५/०१/२०२० असून, नियंत्रक अधिका-याने शिफारस केलेले अर्ज मुदतीपूर्व प्रबोधिनीकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. दिनांक १५/०१/२०२० नंतर आलेले अर्ज स्विकृत केले जाणार नाहीत व अर्ज उशिरा प्राप्त झाल्यामुळे परीक्षार्थीस परीक्षेस बसण्यास परवानगी न मिळाल्यास यास प्रबोधिनी जबाबदार रहाणार नाही.**

११) परीक्षार्थी ज्या अभियांत्रिकी संवर्ग (सहाय्यक कार्यकारी अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-१/उपविभागीय अभियंता/ उपविभागीय अधिकारी) आणि कक्ष (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) यांचेशी संलग्न आहे ते स्पष्टपणे नमूद करावे.

१२) **परीक्षेस बसण्याकरीता परीक्षार्थीची पात्रता:-**

(१) महाराष्ट्र अभियंता सेवा वर्ग-१ (सहा.कार्यकारी अभियंता) मध्ये सरळ सेवेने नियुक्त करण्यांत आलेले अधिकारी.

(२) अ) - महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (सहा.अभियंता श्रेणी-१) मध्ये सरळ सेवेने नियुक्त करण्यांत आलेले अधिकारी.

ब) - (स्थायी व अस्थायी पर्यवेक्षक व कनिष्ठ अभियंता पदावरुन) स्थायी, अस्थायी किंवा स्थानापन्न नात्याने बढती देण्यात आलेले उप अभियंता / उप विभागीय अभियंता / उप विभागीय अधिकारी.

**टिप:- अभावित (Fortuitous) / तात्पुरती बढती देण्यात आलेल्या उप अभियंता/उप विभागीय अभियंता/उप विभागीय अधिकारी यांनी सदर परीक्षेस अर्ज करु नये. (संदर्भः शासन, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक परीक्षा १००२/७२९४/(१७३/२००१)आ. प्रशिक्षण, दिनांक २५/७/२००३).**

१३) (अ) पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळण्याकरीता कर्मचा-याने त्या पदावर किमान १५ वर्षे सेवा पुर्ण करणे अनिवार्य राहील. त्यामुळे संबधीत पदावर कर्मचा-याची १५ वर्षे सेवा पुर्ण झाल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्षे पुर्ण झाल्याचा दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतचा दिनांक हा कर्मचा-यास पदोन्नतीसाठी विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सूट देण्याचा दिनांक समजण्यात येईल.

(ब) परीक्षार्थी वयोमानानुसार सूट देण्यास पात्र ठरत असल्यास, त्याचे नियंत्रक अधिका-याने प्रवेश अर्जातील प्रमाणपत्रांत शिफारस करणे अनिवार्य आहे. त्याखेरीज अशा प्रकारची सूट देय ठरणार नाही. याबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/का.१७, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ०१ मार्च, २०१८ नुसार नोंद घ्यावी. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट १, भाग-१ बी, मधील नियम क्रं.२ चे काटेकोरपणे पालन करावे.

१४) मागील व्यावसायिक परीक्षेच्या गुणपत्रकाच्या आधारे सूट प्राप्त असेल तर सूट नमूद करावयाची असते. जे परिक्षार्थी फक्त एका विषयात अनुत्तीर्ण झाला असेल पण त्याने अन्य विषयाच्या एकूण गुणापैकी किमान 70 टक्के गुण मिळविले असतील तर तो ज्या विषयात अनुउत्तीर्ण झाला असेल फक्त त्या विषयाची परीक्षा देऊ शकेल. परीक्षार्थी अशा प्रकारे सूटपात्र ठरत असल्यास, गुण तक्ता नियंत्रक अधिका-यांकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे. (महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका- परिशिष्ट १, भाग 1 ब, - नियम क्र.२ पहावे).

१५) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिका १ चा अनिवार्य विषय तो ज्या विभागांत काम करीत असेल त्या विभागातील कक्षाशी संबंधीत असावा असा निवडणे आवश्यक आहे.

१६) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिका क्रमांक २ चा ऐच्छिक विषय म्हणून खाली दिलेल्या विषयांपैकी एक विषय निवडावा. सदर विषय तुमच्या कार्यालयीन कामाशी प्रत्यक्ष संबंधित असलेला विषय असावा. एकदा एक विषय निवडल्यानंतर तो बदलण्याची कोणत्याही परिस्थितीत अनुमती दिली जाणार नाही.

| विभाग | ऐच्छिक विषय |
|---|---|
| (अ) जलसंपदा | १) भूजल नि:स्सारण.<br>२) मातीच्या धरणाची संकल्पचित्रे व बांधकाम.<br>३) उपसा सिंचन योजनांचे बांधकाम व परिरक्षण. |
| (ब) सार्वजनिक बांधकाम | रस्ते, इमारती, पूल (आधुनिक पध्दतीच्या रस्ते बांधणीच्या खास पध्दतीसह) |
| (क) यांत्रिकी | १) यांत्रिकी अवजारांचा उपयोग. |

(ड) विद्युत　　　　१) विजेचे प्रक्षेपण व वितरण.

१७) परीक्षा प्रवेश अर्जासोबत परीक्षा प्रवेश पत्र जोडलेले असून त्यावर परीक्षार्थीने स्वम:चे नांव, पदनाम, पूर्ण पत्ता, ऐच्छिक विषय व फोटो लावून तो आपले नियंत्रक अधिकारी यांचेकडून साक्षांकित करून घेणे आवश्यक आहे.

१८) परीक्षार्थीने दिलेली माहिती दिशाभूल करणारी अथवा खोटी असल्याचे आढळून आल्यास परीक्षार्थी शिस्तभंगाची कार्यवाही व परीक्षा विषयक फायदे गमावणे या दोन्ही बाबतीत पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

**१९) परीक्षार्थींची प्रवेशपत्रे महा ऑनलाईन यांचेमार्फत परीक्षार्थींच्या भ्रमणध्वनीवर प्राप्त होतील याची नोंद घ्यावी. परीक्षार्थींनी परीक्षा केंद्राचा पत्ता व पात्र परीक्षार्थींची यादी बाबतची माहिती परीक्षेच्या अगोदर ४ दिवस प्रबोधिनीच्या संकेत स्थळावर बघून खात्री करुन घ्यावी.**

२०) प्रवेशपत्रासाठी पाकीटे जोडण्यात येऊ नये.

**२१) प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल हा अंतिम राहणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेतील परीक्षा नियमानुसार निकालाची फेरतपासणी केली जाणार नाही तसेंच उत्तरपत्रिकांचे गुणपडताळणी / पुनर्मूल्यांकन केले जात नाही याची नोंद घ्यावी.**

सही/-
अधीक्षक अभियंता व सहसंचालक,
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

***